पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक :- २९/८/२००९

पुणे महानगरपालिका

*** सूचना ***

(मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे परिशिष्ठ भाग २ मधील
नियम क्र.१(डी)(एच) व (आय) अन्वये )

**कार्यपत्रिक़ा क्रमांक – ७**
**(खास सभा)**

मा.अनिल शिवाजीराव भोसले,सभागृह नेता,मा.उल्हास उर्फ आबा बागुल,मा.विरेंद्र किराड, मा.ॲड्.अविनाश साळवे, मा.राजेद्र वागसकर,मा.सुनिल बिबवे,मा.अनिल जाधव,मा.सौ.मंगला मंत्री या स्थायी समितीच्या ८ (आठ) मा.सभासदांकडून दिनांक २९/८/२००९ रोजी लेखी मागणी (रिक्वीझिशन) आल्यावरुन **पुणे महानगरपालिकेची विशेष (खास) सभा शुक्रवार, दि. ४/९/२००९ रोजी सकाळी ११:३० (अकरा तीस) वाजता श्री. छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात (मनपा सभागृहात) भरेल.**

**सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.**

विषय क्र. १२३

संदर्भ :- १) मा. प्रमोद भानगिरे यांचे दि. २७/५/०९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. १८४, दि.२/६/०९.
३) मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी पत्र क्रं.मआ/पथ/२१८ दि.३१/०७/०९ ने पाठविलेला अभिप्राय.
४) स्थायी समिती ठराव क्रं. ४९१, दि. १४/८/२००९.

विषय :- वॉर्ड क्रं.९६, मध्ये स.नं.२७ महंमदवाडी मधून जाणारा रस्ता करणे. या कामाचे र.रू. ५० लाख तरतूदीचे वर्गीकरण करणेबाबत.

---

मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी शिफारस केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र.९६ सय्यदनगर अंतर्गत रस्ते विकसित करणेसाठी र.रुपये २५ लाख व वॉर्ड क्र.९६ महमंदवाडी अंतर्गत विविध ठिकाणी रस्ते करणेसाठी र.रुपये २५ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९-२०१० चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १३४, अ.क्र. २६, शहरात निरनिराळ्या ठिकाणी रस्ते डांबरी करणे व तदनुषंगिक कामे करणे, (यादी क्र.एस-२), पान क्र. २३३, अनु.क्र. ३६४, वॉ.क्रं.९६ स.नं. २७ महमदवाडीमधुन जाणारा रस्ता करणे | ५० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| १) वॉर्ड क्र.९६ सय्यदनगर अंतर्गत रस्ते विकसित करणे. | --- | २५ लाख |

२) वॉर्ड क्र.९६ महमंदवाडी अंतर्गत विविध ठिकाणी रस्ते करणे --- २५ लाख

<u>विषय क्र. १२४</u>

संदर्भ :- १) उरुळी फुरसुंगी ग्रामस्थांनी (१) दि. २/१०/२००८ ते ६/१०/२००८ (२) दि. ९/४/२० ०९ ते १४/४/२००९ (३) दि. ७/५/२००९ ते १४/५/२००९ रोजी केलेली तीव्र आंदोलन व त्यामुळे शहरात निर्माण झालेली आरोग्य विघातक परिस्थिती.

२) मा. महा. आयुक्त यांचे क्रं.मआ/घनकचरा/२१२, दि. २८/७/२००९ चे पत्र.

३) मा. विरेंद्र किराड, मा. विजय देशमुख व मा. अनिल भोसले, सभागृह नेता यांचे दिनांक १४/८/२००९ ची उपसूचना.

४) स्थायी समिती ठराव क्रं. ५१४, दि. १४/८/२००९.

---

मा. महा. आयुक्त यांचे संदर्भांकित क्र. २ चे विषयपत्र अवलोकन केले.

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

देवाची ऊरुळी / फुरसुंगी या गावांमध्ये करावयाच्या विविध विकास कामांसाठी व दैनंदिन निर्माण होणाऱ्या कचरा विल्हेवाटीसाठी शास्त्रोक्त पध्दतीने करावयाच्या उपाययोजना व प्रक्रिया प्रकल्पासाठी मनपाच्या ताब्यात असलेल्या जागेवर कचरा निर्मुलनास नविन प्रक्रिया उभारणेस (प्राथमिक तरतूद) सन २००९–२०१० च्या भांडवली व खास अंदाजपत्रकातील र. रुपये ३० कोटी आवश्यक कामाकरिता देवाची ऊरुळी / फुरसुंगी येथे वापरण्याकरिता व नविन प्रक्रिया उभारणेकरिता तसलमात दुबेरजी खात्यातून वापरण्यात यावी व त्याकरिता सन २००९–२०१० चे अंदाजपत्रकातील भांडवली कामातील ज्या कामांची टेंडर मार्च २०१० पर्यंत होणार नाहीत किंवा कामे होणार नाहीत अशा कामांच्या रकमांचे वर्गीकरण करुन तसलमात दुबेरजीमध्ये र. रुपये ३० कोटी जमा करण्याचा व जी कामे सन २००९–२०१० अंदाजपत्रकात झाली नाहीत त्यांची तरतूद २०१०–२०११ अंदाजपत्रकात करण्याचा अधिकार महापालिका आयुक्त यांना देण्यात यावा. सदर प्रस्तावास जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत मान्यता मिळाल्यानंतर सदर पैसे परत तसलमात दुबेरजीकडे वर्ग करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

मा. मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा. महा. आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

<u>विषय क्र. १२५</u>

संदर्भ :- १) मा.बापूसाहेब कर्णे गुरुजी यांचे दि. १६/७/२००९ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्रं. ४०९ दि. २८/७/०९.

३) मा.क्षेत्रिय अधिकारी, येरवडा क्षेत्रिय कार्यालय यांनी क्र. १८९४ दि. ७/८/२००९ ने पाठविलेला अभिप्राय.

४) स्थायी समिती ठराव क्रं. ५२२, दि. १४/८/२००९.

---

मा.क्षेत्रिय अधिकारी, येरवडा क्षेत्रिय कार्यालय यांनी शिफारस केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र.१४ शांतीरक्षक सोसायटीतील रस्ते डांबरी करणेसाठी र.रुपये ३.७५ लाखाचे खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, | | |

| | | |
|---|---|---|
| पान क्र. १३४, अ.क्र. २, शहरातील रस्ते नियोजनाने डांबरी करणे, (यादी क्र. ए–२), पान क्र. २२१, अ.क्र. १५५, वॉर्ड क्र. १४ नगररोड ते जयप्रकाशनगर मुख्य रस्ता डांबरीकरण करणे | ३.७५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र.१४ शांतीरक्षक सोसायटीतील रस्ते डांबरी करणे | --- | ३.७५ लाख |

<u>विषय क्र. १२६</u>

संदर्भ :– १) मा.शिवराम मेंगडे यांचे दि. २८/७/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. ४५३ दि. ४/८/२००९.
३) मा.नगर उप अभियंता(विद्युत), पोल शिफ्टींग विभाग यांनी क्र. उअ/पोशि/३३३, दि. ७/८/२००९ ने पाठविलेला अभिप्राय.
४) स्थायी समिती ठराव क्रं. ५२५, दि. १४/८/२००९.

---

मा.नगर उप अभियंता(विद्युत), पोल शिफ्टींग विभाग यांनी शिफारस केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं. ११२ महर्षि कर्वेनगर विविध ठिकाणचे पोल शिफ्टींग करणेसाठी र.रुपये १९ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाजपत्रक, क्षेत्रिय कार्यालयाने विकेंद्रीकरणाअंतर्गत करावयाची कामे, वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय, डीसीएनटी ९–११/३६, वॉर्ड क्र. ११२ स.नं. ९ कर्वेनगर येथील विकास आराखड्यातील १२ मीटर रस्ता विकसित करणे | १९ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्रं. ११२ महर्षि कर्वेनगर विविध ठिकाणचे पोल शिफ्टींग करणे | --- | १९ लाख |

<u>विषय क्र. १२७</u>

संदर्भ :– १) मा.चंद्रकांत मोकाटे, उपमहापौर व मा.महादेव बाबर यांचे दि. ६/७/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. ३६९ दि. ७/७/०९.
३) मा. अति. महा.आयुक्त (वि) यांनी क्र. मआ/उद्यान/२५६ दि. ११/८/२००९ ने पाठविलेला अभिप्राय.
४) स्थायी समिती ठराव क्रं. ५३८, दि. १४/८/२००९.

---

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी शिफारस केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. १०६ येथील कोथरुड स.नं. ७ व ८ पंडित जितेंद्र अभिषेकी उद्यान येथे विविध विकासाची कामे करणेसाठी र.रुपये ४० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे

शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २००९–२०१० चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १३४, अ.क्र. ३, शहरात विविध रस्त्यावर फुटपाथ करणे व साईडपट्ट्या करणे, (यादी क्र. एस–१), पान क्र. २२४, अ.क्र.९२, वॉर्ड क्र. १०६ गणंजय सोसायटी समोरील मोकळ्या जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणे | ४० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. १०६ मधील कोथरुड स.नं. ७ व ८ पं.जितेंद्र अभिषेकी उद्यान येथे विविध विकासाची कामे करणे | --- | ४० लाख |

<u>विषय क्र. १२८</u>

संदर्भ :– १) मा.सुनिल टिंगरे यांचे दि. २६/५/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. १८१ दि. २/६/२००९.
३) मा. अति. महा. आयुक्त (वि) यांनी क्र. मआ/पथ/२५७ दि. ११/८/२००९ ने पाठविलेला अभिप्राय.
४) स्थायी समिती ठराव क्रं. ५३९, दि. १४/८/२००९.

---

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी शिफारस केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं. २ (विद्यानगर–लोहगांव) मध्ये विविध ठिकाणी रस्ते बी.एम.ए.सी.करणेसाठी र..रू. ६० लाखाचे (साठ लाख) वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २००९–२०१० चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १३४, अ.क्र. २, शहरातील रस्ते नियोजनाने डांबरी करणे, (यादी क्र. ए–२), पथ विभागाकडील याद्या, पान क्र. २१८, अ.क्र. १७, ५/९ चौक ते धानोरी डी.पी.कलम २०५ अन्वये रस्त्यांवर, नाल्यावर कलव्हर्ट बांधणे | ६० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्रं. २ (विद्यानगर–लोहगांव) मध्ये विविध ठिकाणी रस्ते बी.एम.ए.सी.करणे | --- | ६० लाख |

<u>विषय क्र. १२९</u>

संदर्भ :– १) मा.बापूसाहेब कर्णेगुरुजी व मा.बाबु वागसकर यांचे दि. २२/६/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. ३२० दि. ३०/६/२००९.
३) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी क्र. मआ/उकाजा/२५८ दि. ११/८/२००९ ने पाठविलेला अभिप्राय.
४) स्थायी समिती ठराव क्रं. ५४०, दि. १४/८/२००९.

---

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी शिफारस केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र.१४ मध्ये स.नं.१९१ महाराष्ट्र हौसिंग बोर्ड एच १ ते १० बिल्डींग भागातील गार्डन विकसित करण्यासाठी र.रु.५ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९-२०१० चे अंदाजपत्रक, १६.उद्याने, प्राणीसंग्रहालये, पान क्र. १७६, अ.क्र. ९१, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे, (यादी क्र.एस-२७), पा.क्र.२५५,अ.क्र.४, वॉर्ड क्र.१४ स.नं.२०१,२०२ मध्ये गार्डन विकसीत करणे | ५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र.१४ मध्ये स.नं.१९१ महाराष्ट्र हौसिंग बोर्ड एच १ ते १० बिल्डींग भागातील गार्डन विकसित करणे | --- | ५ लाख |

**<u>विषय क्र. १३०</u>**

संदर्भ :- १) मा.बंडु केमसे यांचे दि. १/६/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. २२९ दि. १६/६/२००९.
३) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी क्र. मआ/उकाजा/२६० दि. ११/८/२००९ ने पाठविलेला अभिप्राय.
४) स्थायी समिती ठराव क्रं. ५४१, दि. १४/८/२००९.

---

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी शिफारस केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉर्ड क्रं. ६१ स.नं. ९४ ते ९७ येथील भारतरत्न पंडित भिमसेन जोशी उद्यान येथे पंडित जोशी यांचे दगडी शिल्प बसविण्यासाठी र.रू. १५ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९- २०१० चे अंदाजपत्रक, १६.उद्याने, प्राणीसंग्रहालये, पान क्र. १७६, अ.क्र. ९१, शहरातील विविध उद्यानामध्ये विकास कामे करणे, (यादी एस-२७), पा.क्र. २५६, अ.क्र. ४७, उद्यानात नामवंत कवीच्या प्रसिध्द आणि संस्कारक्षम कविता सर्वांना सहजतेने वाचता येतील अशा पाट्यांच्या स्वरुपात बसवून कविता गार्डन करणे | १५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्रं. ६१ स.नं. ९४ ते ९७ येथील भारतरत्न पंडित भिमसेन जोशी उद्यान येथे पंडित जोशी यांचे दगडी शिल्प बसविणे | --- | १५ लाख |

**<u>विषय क्र. १३१</u>**

संदर्भ :- १) मा.आबा बागुल, विरोधी पक्षनेता व मा.विरेंद्र किराड यांचे दि. २३/६/२००९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ३११ दि. २३/६/२००९.
३) मा.नगर उपअभियंता(उद्यान), पुणे मनपा यांचे पत्र क्र. उकाजा/९३६ दि. १५/७/२००९.
४) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/भवन/३०० दि. १८/८/२००९ चे पत्र.
५) स्थायी समिती ठराव क्रं. ५७९, दि. १८/८/२००९.

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी शिफारस केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस

अनुसरुन –

वॉर्ड क्रं. ११६ मध्ये शाळा बांधणेसाठी र.रुपये ३०.६५ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २००९– २०१० चे अंदाजपत्रक, १६.उद्याने, प्राणीसंग्रहालये, पान क्र. १७६, अ.क्र. ९१, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे (यादी क्र. एस–२७), पान क्र. २५५, अ.क्र. ३२, वॉर्ड क्र. ११६, स.नं. ४३ पर्वती येथील बागुल उद्यानासमोरील कॉम्प्युटर लायब्ररी विकसित करणे (एकूण तरतूद रुपये ५० लाख) | ३०.६५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्रं. ११६ मध्ये शाळा बांधणे | --- | ३०.६५ लाख |

**<u>विषय क्र. १३२</u>**

संदर्भ :– १) मा.किरण बारटक्के व मा.किशोर शिंदे यांचे दि. १२/८/२००९ चे पत्र.

२) मा. स्थायी समिती ठ.क्र. ५५१, दि. १८/८/२००९

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ११० वारजे माळवाडी परिसरातील विविध ठिकाणी पाण्याची नविन लाईन टाकणेसाठी र.रुपये ८ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २००९–२०१० चे अंदाजपत्रक, क.अंदाजपत्रक, २.गटारे व नाले, पान क्र. ३२, अ.क्र. ३, मलनि:सारण प्रकल्प, सन २००८–०९ मध्ये सूचविण्यात आलेली कामे परंतू ३१ मार्च २००९ नंतर खर्च पडत असल्याने सुचविण्यात आलेली कामे, (यादी क्र. झेड–२), मलनि:सारण प्रकल्प, पान क्र. ५८, अ.क्र. ६, वॉर्ड क्र. ११० वारजे माळवाडी विठ्ठलनगर, गोकुळनगर, अमर भारत नगर व आदर्श नगर इ.परिसरात मलवाहिनी टाकणे | ८ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. ११० वारजे माळवाडी परिसरातील विविध ठिकाणी पाण्याची नविन लाईन टाकणे | --- | ८ लाख |

**<u>विषय क्र.१३३</u>**

संदर्भ :– १) मा.किरण बारटक्के व मा.किशोर शिंदे यांचे दि. १२/८/२००९ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठ.क्र.५५२, दि. १८/८/२००९

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ११० वारजे स.नं. १०७/१०/१०८/१ओ/८नवा स.नं. १०८/१, ६/२ याठिकाणी जलतरण तलाव बांधणेसाठी र.रुपये २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९-२०१० चे अंदाजपत्रक, १२.भवने, भुमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १६४, अ.क्र. ८८, शहरात विविध ठिकाणी समाजमंदिर, ग्रंथालय, वाचनालय, अभ्यासिका बांधणे, (यादी क्र. एस-१६), पान क्र. २५४, अ.क्र. ११२, वॉर्ड क्र. ११० मध्ये स.नं. १३४ वरदा सोसायटी येथे विरंगुळा केंद्र बांधणे | १० लाख | --- |
| १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १३४, अ.क्र. २६, शहरात निरनिराळ्या ठिकाणी रस्ते डांबरीकरण व तदनुषंगिक कामे करणे, (यादी क्र. एस-२), पान क्र. २३१, अ.क्र. २४७, वॉर्ड क्र. ११० मध्ये संघर्षनगर, सहयोगनगर, अमर भारत सोसायटी, भागीरथीनगर संपूर्ण रस्ता विकसित करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्र. ११० वारजे स.नं. १०७/१०/१०८/१ओ/८नवा स.नं. १०८/१, ६/२ याठिकाणी जलतरण तलाव बांधणे | --- | २०लाख |

<u>विषय क्र.१३४</u>

संदर्भ :- १) मा.अंकुश तिडके व मा.शिवराम मेंगडे यांचे दि. २०/५/२००९ चे पत्र

२) स्थायी समिती ठराव क्रं. १४५ दि. २६/५/२००९

३)मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी क्र. मआ/विकाक्र.१/२७७ दि. १२/८/२००९ ने पाठविलेला अभिप्राय

४) मा.स्थायी समिती ठ.क्र.५५७, दि. १८/८/२००९

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी शिफारस केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉर्ड क्र.६० मध्ये विविध ठिकाणी फुटपाथ करणेसाठी र.रु. ११.२५ लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९-१० चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १३४, अ.क्र. २, शहरातील रस्ते नियोजनाने डांबरी करणे, (यादी क्रं.ए-२), पान क्र. २२०, अ.क्र. १०५, वॉर्ड क्र. ६० परमहंसनगर येथे रस्ता दुभाजक करणे | ११.२५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्र.६० मध्ये विविध ठिकाणी फुटपाथ करणे | --- | ११.२५ लाख |

<u>विषय क्र.१३५</u>

संदर्भ :- १) मा.अंकुश तिडके व मा.शिवाजी बांगर यांचे दि. २७/५/२००९ चे पत्र

२) स्थायी समिती ठराव क्रं. १९१ दि. २/६/२००९

३) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी क्र. मआ/विकाक्र.१/२७८ दि. १२/८/२००९ ने पाठविलेला अभिप्राय.

४) मा.स्थायी समिती ठ.क्र.५५८, दि. १८/८/२००९

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी शिफारस केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं. ६० मध्ये फुटपाथ करणेकामी १२.२५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९– २०१० चे अंदाजपत्रक, क्षेत्रिय कार्यालयाने विकेंद्रीकरणा अंतर्गत करावयाची कामे, कर्वे रोड क्षेत्रिय कार्यालय, सीई २० अे १२२८/बी २ –३४, डीसीएनटी–९–८/३६, वॉर्ड क्रं.६० परमहंसनगर येथे दुभाजक करणे. | १२.२५ लाख | ––– |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्रं. ६० मध्ये फुटपाथ करणे | ––– | १२.२५ लाख |

<u>विषय क्र.१३६</u>

संदर्भ :– १) मा.सागर माळकर यांचे दि. ३/७/२००९ चे पत्र

२) स्थायी समिती ठराव क्रं. ३७४ दि. २४/७/२००९

३) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी क्र. मआ/पथ/२८० दि. १२/८/२००९ ने पाठविलेला अभिप्राय.

४) मा.स्थायी समिती ठ.क्र.५५९, दि. १८/८/२००९

---

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी शिफारस केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ६ येरवडा प्रिझन प्रेस मध्ये विविध ठिकाणी रस्ते व फुटपाथ करणेसाठी र.रुपये ६० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–२०१० चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १३४, अ.क्र. २६, शहरात निरनिराळ्या ठिकाणी रस्ते डांबरीकरण व तदनुषंगिक कामे करणे, (यादी क्र. एस–२), पान क्र. २२६, अ.क्र. ६, वॉर्ड क्र. ६ येरवडा प्रेस कर्मचारी वसाहत ते टिंगरेनगर एअरपोर्टपर्यंत ६० फुटी डी.पी.रोड तयार करणे | ६० लाख | ––– |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्र. ६ येरवडा प्रिझन प्रेस मध्ये विविध ठिकाणी रस्ते व फुटपाथ करणे | ––– | ६० लाख |

**विषय क्र.१३७**

संदर्भ :– १) मा.अनिल जाधव व मा.सुनिल बिबवे यांचे दि. १४/८/२००९ चे पत्र.
२) मा. स्थायी समिती ठ.क्र. ५६९, दि. १८/८/२००९

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं. ११५ मधील स.नं. ९३ लक्ष्मीनगर येथे पोहोण्याचा तलाव बांधणे कामी र.रुपये २३ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९– २०१० चे अंदाजपत्रक, क्षेत्रिय कार्यालयाने विकेंद्रीकरणाअंतर्गत करावयाची कामे, सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय, डी.सी.एन.टी. ९–३३/३६, तुळशीबागवाले कॉलनीतील विविध रस्ते डांबरीकरण करणे | २३ लाख | ––– |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्रं. ११५ मधील स.नं. ९३ लक्ष्मीनगर येथे पोहोण्याचा तलाव बांधणे | ––– | २३ लाख |

**विषय क्र.१३८**

संदर्भ :– १) मा.निलेश निकम, अध्यक्ष–स्थायी समिती यांचे दि. १८/८/२००९ चे पत्र.
२) मा. स्थायी समिती ठ.क्र. ५७१, दि. १८/८/२००९

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं. ५३ पत्रकारनगर, बारामती होस्टेल रस्ता फुटपाथ करणे व सुशोभित करणे या चालू कामासाठी कमी पडणारी तरतूदीसाठी र.रुपये १७ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९– २०१० चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १४८, अ.क्र. २६९, सन २००८–०९ मध्ये सुचविण्यात आलेली कामे परंतू दि. ३१ मार्च २००९ नंतर खर्च पडत असल्याने सूचविण्यात आलेली कामे, (यादी क्र. झेड १), पान क्र. २६५, अ.क्र. ४२, वॉर्ड क्र. ५३ येथे विविध ठिकाणी रस्ते करणे (एकूण तरतूद रुपये ५६.२५ लाख) | १७ लाख | ––– |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्रं. ५३ पत्रकारनगर, बारामती होस्टेल रस्ता फुटपाथ करणे व सुशोभित करणे या चालू कामासाठी कमी पडणारी तरतूद | ––– | १७ लाख |

**विषय क्र.१३९**

संदर्भ :– १) मा.अंकुश तिडके व मा.सचिन भगत यांचे दि. १४/५/२००९ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ११७ दि. १९/५/२००९

३) मा.उप आयुक्त(तांत्रिक) यांचे पत्र जा.क्र. ४६६ दि. १०/६/२००९

४) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/उद्यान/२८५ दि.१४/८/०९ ने पाठविलेला अभिप्राय.

५) मा. स्थायी समिती ठ.क्र. ५७५, दि. १८/८/२००९

---

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी शिफारस केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉ.क्र.६० मध्ये परमहंस नगर याठिकाणी विद्युत केबल अंडरग्राऊंड करणेसाठी र.रु.२५ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाजपत्रक, १६.उद्याने, प्राणिसंग्रहालये, पान क्र. १७६, अ.क्र. ९१, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे,(यादी क्र.एस–२७), | | . |
| पान क्र.२५५, अ.क्र.१५, वॉर्ड क्र. ६० आनंद कृपा सोसायटी उद्यान विकसित करणे, | १५ लाख | --- |
| पान क्र.२५५, अ.क्र.१६, वॉर्ड क्र.६० सहकारवृंद सोसायटी उद्यान विकसित करणे. | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉ.क्र.६० मध्ये परमहंस नगर याठिकाणी विद्युत केबल अंडरग्राऊंड करणे | --- | २५ लाख |

<u>**विषय क्र.१४०**</u>

संदर्भ :– १) मा.शिवराम मेंगडे यांचे दि. १७/७/२००९ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ४१९ दि. २८/७/२००९

३) मा. उपायुक्त विभाग क्र. १ यांचे पत्र जा.क्र. ४६० दि. १०/७/२००९

४) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/भवन/२९९ दि. १८/८/२००९ चे पत्र.

५) मा. स्थायी समिती ठ.क्र. ५७८, दि. १८/८/२००९

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी शिफारस केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं.११२ मधील स.नं.११ कर्वेनगर येथील पोहण्याचे तलाव बांधण्यासाठी कमी पडणारी रक्कम र.रुपये २६ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–२०१० चे अंदाजपत्रक, | | |
| १) १७.खेळ व क्रिडांगणे, पान क्र. १८०, अ.क्र. ५१, शहरात विविध क्रिडांगणामध्ये विकास कामे करणे, यादी क्र एस –२८, पान क्र.२५६, अ.क्र.२१, वॉ.क्र.११२,जॉगिंग ट्रॅक विविध विकासाची कामे करणे. | १० लाख | --- |
| २) क्षेत्रिय कार्यालयाने विकेंद्रीकरणातंर्गत करावयाची कामे, वारजे कर्वेनगर क्षेत्रिय | | |

कार्यालय, डीसीएनटी९–११/३६, वॉ.क्र.११२ स.न.११ व १५ मधून जाणाऱ्या नाल्याचे चॅनेलायझेशन करणे. १३ लाख ---

३) १२.भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १६६, अ.क्र. १३४, भवन विभागातर्गत विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे, (यादी क्र.जे –१०), पान क्र. २४८, अ.क्र. २१, कर्वेनगर स.नं.१५, श्रीपाद अपार्टमेंट समोर आंगणवाडी बांधणे व हिरकणी कॉलनी समोरील आंगणवाडीच्या बाजूस पेव्हींग ब्लॉक बसविणे. ३ लाख ---

नविन सुचविलेले काम

वॉर्ड क्रं.११२ मधील स.नं.११ कर्वेनगर येथील पोहण्याचे तलाव बांधण्यासाठी कमी पडणारी रक्कम खर्ची करणे. --- २६ लाख

<u>विषय क्र.१४१</u>

संदर्भ :– १) मा.श्रीमती इंदुताई फुलावरे यांचे दि. १४/५/२००९ चे पत्र

२) स्थायी समिती ठराव क्रं. ११९ दि. १९/५/२००९

३) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी क्र. मआ/विकाक्र.२/२८६ दि. १७/८/२००९ ने पाठविलेला

अभिप्राय

४) स्थायी समिती ठ.क्र.५९२, दि. २४/८/२००९

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी शिफारस केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं.४७ मध्ये वॉर्डातील शौचालयाच्या दुरुस्त्या करणे व मुताऱ्या बांधणेसाठी र.रुपये ८ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाजपत्रक, अंदाजपत्रक अ व क मधील क्षेत्रिय कार्यालयाने भांडवली निधीतून करावयाची कामे, ढोलेपाटील रोड क्षेत्रिय कार्यालय, सीपीटीएल ९–१७/५१, वॉ.क्रं.४७ मध्ये ३५/३६ वेलस्ली रोड याठिकाणी फरशी व कॉंक्रीट करणे | ८ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्रं.४७ मध्ये वॉर्डातील शौचालयाच्या दुरुस्त्या करणे व मुताऱ्या बांधणे | --- | ८ लाख |

<u>विषय क्र.१४२</u>

संदर्भ :– १) मा.सौ.रजनी त्रिभुवन यांचे दि. ६/६/२००९ चे पत्र

२) स्थायी समिती ठराव क्रं. २५२ दि. १६/६/२००९

३) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी क्र. मआ/विकाक्र.२/२८७ दि. १७/८/२००९ ने पाठविलेला

अभिप्राय

४) स्थायी समिती ठ.क्र.५९३, दि. २४/८/२००९

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी शिफारस केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं. ३८ ताडीवाला रोडमध्ये भाजीमंडई बांधणेसाठी खालीलप्रमाणे र.रुपये १० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाज पत्रक, १२.भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १६०, अ.क्र. ३५, शहरात विविध ठिकाणी व्यायामशाळा बांधणे, (यादी क्रं. एस–१२), पान क्र.२५०, अ.क्र. ७, वॉर्ड क्र. ३८ म.गांधी उद्यान येथे व्यायामशाळा बांधणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्रं. ३८ ताडीवाला रोडमध्ये भाजी मंडई बांधणे | --- | १० लाख |

**<u>विषय क्र.१४३</u>**

संदर्भ :– १) मा.श्रीमती इंदुताई फुलावरे यांचे दि. १४/५/२००९ चे पत्र

२) स्थायी समिती ठराव क्रं. ११८ दि. १९/५/२००९

३) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी क्र. मआ/विकाक्र.२/२८८ दि. १७/८/२००९ ने पाठविलेला अभिप्राय

४) स्थायी समिती ठ.क्र.५९४, दि. २४/८/२००९

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी शिफारस केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं.४७ मधील कॉलनी क्र. २ येथील खोल्यांचे पत्रे बदलणेकरिता र.रु. ५ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाज पत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १३४, अ.क्र. २६, शहरात निरनिराळ्या ठिकाणी रस्ते डांबरी करणे व तंदनुषंगिक कामे करणे, (यादी क्रं.एस–२), पान क्र. २२८ अनु क्र ११३, वॉ.क्रं.४७ मध्ये कॉलनी क्र.२ या ठिकाणी पटांगणामध्ये डांबरीकरण करणे | ५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्रं.४७ मधील कॉलनी क्र. २ येथील खोल्यांचे पत्रे बदलणे | --- | ५ लाख |

**<u>विषय क्र.१४४</u>**

संदर्भ :– १) मा.विकास दांगट व मा.सौ.ज्योत्सना सरदेशपांडे यांचे दि. ३/६/२००९ चे पत्र

२) स्थायी समिती ठ.क्रं.२३१,दि.१६/६/२००९

३)मा.सहा.अभियंता (भू.जि.)पुणे मनपा यांचे पत्र क्रं.एल.ई.ओ.२१४२ दि.३०/७/२००९

४) मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्रं.मआ–भवन– ३१६,दि.२१/८/२००९

५) स्थायी समिती ठ.क्र. ६१६, दि. २४/८/२००९

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व शिफारस केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं. १३० मध्ये स.नं.४६ सी.वाय.डी.पी.शाळेकडे जाणाऱ्या रस्त्यावरील अर्धवट भिंतीचे काम पूर्ण करणेसाठी र.रु.३० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाज पत्रक,<br>१९ भाजी मंड्या व पशुवधगृहे पान क्रं.१८४ अ.क्रं.१७<br>शहरातील विविध भाजी मंड्यामध्ये विकास कामे करणे.<br>पान क्र.२५७, अ.क्र.२२ यादी क्र.एस–२९ वॉर्ड क्रं. १३० मध्ये भाजी मंडई बांधणे. | ३० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्रं. १३० मध्ये स.नं.४६ सी.वाय.डी.पी.शाळेकडे जाणाऱ्या रस्त्यावरील अर्धवट भिंतीचे काम पूर्ण करणे. | --- | ३० लाख |

**<u>विषय क्र.१४५</u>**

संदर्भ :– १) मा.सौ.विद्या भोकरे व मा.सौ.वर्षा तापकीर यांचे दि. ३०/७/२००९ चे पत्र
२) स्थायी समिती ठ.क्रं.४६१,दि.४/८/२००९
३) मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्रं.मआ–वि.का.क्रं.२ – ३३३,दि.२४/८/२००९
४) स्थायी समिती ठ.क्र.६२०, दि. २४/८/२००९

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व शिफारस केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं.५० मधील २२७ पवळे चौक,कसबा पेठ याठिकाणी विरंगुळा केंद्र बांधणेसाठी र.रु.१० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाज पत्रक, १२.भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १६४, अ.क्र. ८८, शहरात विविध ठिकाणी समाजमंदिर, ग्रंथालय, वाचनालय, अभ्यासिका बांधणे, (यादी एस–१६), पान क्र. २५३, अ.क्र.७८, कसबा पेठ येथील गार्डनसाठी आरक्षित असलेल्या जागेवर विरंगुळा केंद्र बांधणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्रं.५० मधील २२७ पवळे चौक,कसबा पेठ याठिकाणी विरंगुळा केंद्र बांधणे. | --- | १० लाख |

**<u>विषय क्र.१४६</u>**

संदर्भ :– १) मा.सुनिल बिबवे व मा.अनिल जाधव यांचे दि. २४/८/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठ.क्र. ६२९, दि. २४/८/२००९

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं. १२३ बिबवेवाडी मधील विविध ठिकाणचे रस्ते डांबरीकरण करणेसाठी र.रु. १० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९-१० चे अंदाज पत्रक, १२.भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १६४, अ.क्र. ८८, शहरात विविध ठिकाणी समाजमंदिर, ग्रंथालय, वाचनालय, अभ्यासिका बांधणे, (यादी एस-१६), पान क्र. २५४, अ.क्र. १२०, वॉर्ड क्र. १२३ गणपतनगर वसाहत समाजमंदिराचा मजला वाढविणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्रं. १२३ बिबवेवाडी मधील विविध ठिकाणचे रस्ते डांबरीकरण करणे | --- | १० लाख |

<u>विषय क्र.१४७</u>

संदर्भ :- १) मा.अभय छाजेड व मा.आबा बागुल,विरोधी पक्षनेते,यांचे दि.२४/८/२००९ चे पत्र
२) स्थायी समिती ठ.क्र. ६३०, दि. २४/८/२००९

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन --

सणस स्पोर्टस ग्राऊंड येथे स्पोर्टस होस्टेल व प्रेक्षक गॅलरी बांधणेकरिता र.रू.१.००,००,०००/- ( एक कोटी ) चे वर्गीकरण खालील प्रमाणे मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९-१० चे अंदाज पत्रक | | |
| १२ भवने भूमी व चाळी यांची व्यवस्था | | |
| १) पान क्र.१६८,अ.क्र.१८७, महापालिका व मनपा भवन कार्यालयात महिलांसाठी अत्याधुनिक स्वच्छता गृहे बांधणे. एकूण तरतूद ७५ लाख | २५ लाख | --- |
| २) पान क्र.१६८,अ.क्र.१८७, महापालिका महिला सेविकांसाठी मनपा मुख्य इमारतींमध्ये विश्रांतीगृह बांधणे, एकूण तरतूद ७५ लाख | २५ लाख | --- |
| ३) १९ भाजी मंड्या व पशूवधगृहे पान क्रं.१८४ अ.क्र.१७ शहरातील विविध भाजी मंड्या मध्ये विकास कामे करणे, यादी क्र.एस २९,पान क्र.२५७, अ.क्र.१८, वॉ.क्र.१०२ नाल्यावर स्लॅब टाकून पथारी व्यावसायिकांचे पुनर्वसन करणे, एकूण तरतूद ५० लाख | २५ लाख | --- |
| ४) पान क्र.२५७ ,अ.क्र.२, मुंढवा येथील नाल्यावर स्लॅब टाकून भाजी मार्केट बांधणे, एकूण तरतूद ५० लाख | २५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम - | | |
| सणस स्पोर्टस ग्राऊंड येथे स्पोर्टस होस्टेल व प्रेक्षक गॅलरी बांधणे . | --- | १ कोटी |

<u>विषय क्र.१४८</u>

संदर्भ :- १) मा.महादेव बाबर व मा.तानाजी लोणकर यांचे दि.१/७/२००९ चे पत्र
२) स्थायी समिती ठ.क्रं.३५३,दि.७/७/२००९
३) मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्रं.मआ-भवन-३१७,दि.२१/८/२००९
४) स्थायी समिती ठ.क्र. ६४४, दि. २४/८/२००९

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व शिफारस केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

पुजा मंगल कार्यालय ते कोंढवा मुख्य रस्ता दरम्यान ४०० मि.मी.व्यासाची एम.एस.जलवितरण नलिका टाकणेकरीता खालीलप्रमाणे र.रु.१५ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९-१० चे अंदाज पत्रक,''क '' १ पाणी पुरवठा पान क्रं.२६ अ.क्रं.४(अ) शुध्द पाण्याच्या मुख्य नलिका टाकणे शहराच्या मध्यवर्ती भागाच्या विकासासाठी पाण्याची लाईन टाकणे.(यादी एस-५), पान क्र.४०, अ.क्र.१३२, वॉ.क्रं.१२० कोंढवा खुर्द पंपिग स्टेशन येथील पाण्याच्या टाकीच्या उर्वरीत कामे करणेसाठी. | १५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>पुजा मंगल कार्यालय ते कोंढवा मुख्य रस्ता दरम्यान ४०० मि.मी.व्यासाची एम.एस.जलवितरण नलिका टाकणे. | --- | १५ लाख |

<u>विषय क्र.१४९</u>

संदर्भ :- १) मा.अनिल भोसले व मा.बाळासाहेब बोडके यांचे दि. २४/८/२००९ चे पत्र.

२) स्थायी समिती ठ.क्र. ६५४, दि. २४/८/२००९

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

शिवाजीनगर गावठाण के प्लॉट येथील आर्टिफिशियल क्लायबिंग वॉलचे उर्वरित काम करणे व विद्युतविषयक कामे करणेसाठी र.रुपये ३० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९-१० चे अंदाजपत्रक, भांडवली कामे, ५.लोकारोग्य, पान क्र. १२८, अ.क्र. ८१, शहरात स्मशान भूमीमध्ये विकासाची कामे करणे, (यादी क्र. एस-२४), पान क्र. २४७, अ.क्र. २३, वॉर्डसभा आरोग्य कोठीमार्फत नागरिकांना थेट सुविधा देणे | ३० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>शिवाजीनगर गावठाण के प्लॉट येथील आर्टिफिशियल क्लायबिंग वॉलचे उर्वरित काम करणे व विद्युतविषयक कामे करणे | --- | ३० लाख |

<u>विषय क्र.१५०</u>

संदर्भ :- १) मा.सुनिल टिंगरे यांचे दि. २६/५/२००९ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्रं. १८२ दि. २/६/२००९

३) मा.नगर उपअभियंता(विद्युत) विकेंद्रीत कामे यांचेकडील पत्र जा.क्र. एसडब्ल्युओ/२०७७ दि. ४/८/२००९

४) स्थायी समिती ठराव क्र.५२४,दि. १४/८/२००९.

४) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी क्र. मआ/विकाक्र.२/३६९ दि. २४/८/२००९ ने पाठविलेला

अभिप्राय

५) स्थायी समिती ठ.क्र.६६०, दि. २४/८/२००९

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी शिफारस केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं. २ (विद्यानगर–लोहगांव) मधील विद्यानगर परिसरामध्ये फुटपाथ तयार करणेकरीता र..रू. २० लाखाचे (वीस लाख) वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९– २०१० चे अंदाजपत्रक, १०.ग.विद्युत विभाग, पान क्र. १५२, अ.क्र. २१, शहरातील विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे, (यादी क्र. एस–११), पान क्र. २३९, अ.क्र. ४, वॉर्ड क्र. २ विद्यानगर लोहगांवमधील कलवड खेसेपार्क जेपीनगर बर्मासेल विद्यानगर परिसरामध्ये भुमिगत केबल टाकणे | २० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्रं. २ (विद्यानगर–लोहगांव) मधील विद्यानगर परिसरामध्ये फुटपाथ तयार करणे | --- | २० लाख |

<u>विषय क्र.१५१</u>

**संदर्भ :** १. मुख्य सभा ठराव क्र. ४७६, दिनांक २१/१/२००९.

२. मा.अति.महा.आयुक्त (ज)यांचा दिनांक ३/८/२००९ रोजीचा प्रशासनाचा अहवाल.

३. मे.शासनाचा शासन निर्णय क्र. संकिर्ण १००९/प्रक्र ३५५/नवि २६, दिनांक १० ऑगस्ट २००९.

४. मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्र क्र.मआ/मुले/३८०, दिनांक २६/८/२००९.

५. मा.वेतन आयोग नैमित्तिक सभा अंतिम अहवाल दिनांक २८/८/२००९.

६. स्थायी समिती ठराव क्र.६६३,दि. २९/८/२००९.

**विषय : पुणे महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी यांना सहावा वेतन आयोग लागू करणेबाबत.**

---

**मा.महा.आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –**

पुणे महानगरपालिकेच्या अधिकारी व सेवकांच्या वेतनश्रेणी सुधारणा नियमावलीस,सुधारित वेतनश्रेण्यास,भत्ते तसेच माध्यमिक, उच्च माध्यमिक व तांत्रिक शाळांमधील शिक्षकेतर सेवकांना लागू करावयाच्या सुधारित वेतनश्रेण्याबाबत मा.महा.आयुक्त यांनी त्यांचे पत्रासोबत जोडलेल्या अ,ब,ब(१) आणि क परिशिष्टांस व नैमित्तीक समितीने (वेतन आयोग समिती) शिफारस केलेल्या खालील १ ते ९ बाबीस व १ ते ५ प्रमाणे अंमलबजावणी करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(१) **मा.महा.आयुक्तांचे अहवालातील भाग–३ – ग्रेड पे**

मे.शासन निर्णयानुसार वेतनश्रेणीच्या कमाल वेतनाच्या ४०% ग्रेड पे करावा. यामध्ये पुणे महानगरपालिकेच्या वेतनश्रेणीनुसार कमाल वेतनावर ४०% ग्रेड पे करावा.

(२) **परिशिष्ठ–क**

परिशिष्ठ–क मध्ये शिफारस केलेल्या महानगरपालिकेकडील भत्त्यांमध्ये मा.महा.आयुक्तांचे अहवालामध्ये दीडपट वाढ सूचविण्यात आली होती, त्यामध्ये प्रचलीत भत्त्यांमध्ये दुप्पटीने वाढ करण्यात यावी.

तसेच ज्या सेवकांना रुपये १२५/– घाण भत्ता लागू आहे, त्यांना रुपये ५००/– घाण भत्ता लागू करावा.

(३) **अभियंता संघ**

पुणे महानगरपालिकेकडील **सहाय्यक अभियंता** हे पद शासनाकडील उप अभियंता, उपविकास अभियंता, सहाय्यक अभियंता श्रेणी–१ या पदांशी समकक्ष आहे. पुणे महानगरपालिकेकडील सहाय्यक अभियंता या पदांना मंजूरी देताना, त्याबाबत मागील वर्षाच्या फेरफार तक्त्यामध्ये योग्य तो बदल मा.मुख्य सभेने देखील मान्य केलेला आहे व सदर पद शासनाकडील उप अभियंता या पदाशी समकक्ष केलेले आहे. त्यामुळे पुणे महानगरपालिकेकडील सहाय्यक अभियंता (शासनाकडील उप अभियंता) या पदाची सुधारीत वेतनश्रेणी रुपये १५६००–३९१०० अशी करण्यात यावी.

(४) **नगर अभियंता व आरोग्य प्रमुख**

पुणे शहरासाठी **नगर अभियंता** व आरोग्य प्रमुख ही वैधानिक पदे असल्यामुळे, तसेच नगर अभियंता हे पद शासनाकडील **मुख्य अभियंता** या पदाशी समकक्ष असल्यामुळे व मा.मुख्य सभेने त्याप्रमाणे ठराव केलेला असल्यामुळे नगर अभियंता व आरोग्य प्रमुख या दोन पदांची सुधारीत वेतनश्रेणी शासनाच्या पे–बॅण्ड–४ नुसार रुपये ३७४००–६७००० अशी करण्यात यावी. तसेच नगर अभियंता व आरोग्य प्रमुख यांना ग्रेड पे रु.९,९००/– करावा.

(५) मा.महा.आयुक्त यांचे अहवालातील अ.क्र. २१ मध्ये प्रचलीत वेतनश्रेणी रुपये १०६५०–२२१५० या वेतनश्रेणीत कार्यरत असणाऱ्या अधिकारी/सेवकांना पे–बॅण्ड पीबी–३ रुपये १५६००–३९१०० आणि ग्रेड पे रु. ८,९००/– यात येणाऱ्या एकूण बेरजेच्या २०% अतिरिक्त वेतन देणेस शिफारस आहे.

(६) **अन्न निरीक्षक**

अन्न निरीक्षक या पदाकरीता शासनाने मान्य केलेल्या निर्णयानुसार सुधारीत वेतनश्रेणी रुपये ९३००–३४८०० प्रमाणे पे–बॅण्ड मान्य करण्यात यावा. याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा सुधारीत वेतनश्रेणी २००९ मधील पान क्र. २७८ अ.क्र. २८ वर याचा स्पष्ट उल्लेख आहे.
(सोबत प्रत)

(७) **पशु वैद्यकीय अधिकारी**

पशु वैद्यकीय अधिकारी यांना व्यवसाय रोध भत्ता (एनपीए) देण्यात यावा.

(८) **आरेखक**

मा.महा.आयुक्तांच्या अहवालातील अ.क्र. १२ वरील आरेखक या पदासाठी मे.शासनाच्या शासन निर्णयाप्रमाणे अंतर्गत कालबद्ध पदोन्नतीची वेतनश्रेणी ७ वर्षाऐवजी ४ वर्षानंतर देण्यात यावी.
तसेच आरेखक यांच्यासाठी सन १९९६ च्या ५ व्या वेतन आयोगातील **तळटीप –**

**''(७) वर्षाच्या अर्हतकारी सेवेनंतर अनुज्ञेय अनुरेखक व आरेखक या पदावरील सेवकांना वरीष्ठ श्रेणीचा लाभ देताना दि. १/१/१९९६ रोजी अथवा त्यानंतर विहीत सेवापूर्ण झाल्यानंतर देय राहील. यापूर्वी देण्यात आलेल्या कालबद्ध पदोन्नतीचा लाभ रद्द करुन समायोजन करण्यात येईल.''**
ही रद्द करण्यात यावी.

(९) **ऑक्झिलरी नर्स**

ऑक्झिलरी नर्स व ज्युनियर नर्स यांचे कामामध्ये तफावत नसल्यामुळे समान काम–समान वेतन या मे.हाय कोर्टाच्या निर्णयानुसार ऑक्झिलरी नर्स यांची वेतनश्रेणी रुपये ४०००–९६९५ ही ज्युनियर नर्सच्या वेतनश्रेणीप्रमाणे करुन सुधारीत वेतनश्रेणी रुपये ४५००–१००५५ अशी करण्यात यावी.

**आणि**

(१) वरील अ.क्र. १ ते ९ प्रमाणे मा.वेतन आयोग नैमित्तिक समितीने केलेल्या शिफारशीप्रमाणे पुणे महानगरपालिकेच्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना ६ वा वेतन आयोग लागू करण्यात यावा.

(२) ६ वा वेतन आयोग पुणे महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांना माहे ऑक्टोंबर पेड इन नोव्हेंबर २००९ च्या वेतनामध्ये समाविष्ठ करण्यात यावा.

(३) सन २००९–१० या आर्थिक वर्षामध्ये ६ वा वेतन आयोग लागू करताना अंदाजपत्रकीय तरतुदीमध्ये जेवढी रक्कम कमी पडेल तेवढी रक्कम वर्गीकरणाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

(४) मा.स्थायी समितीच्या ठरावाप्रमाणे रक्कम रुपये १५०००/– चा ॲडव्हान्स देण्यात यावा.

(५) राज्य शासनाचे आदेशाप्रमाणे ५ हप्त्यांमध्ये ६ व्या वेतन आयोगाची वेतनाची थकबाकी देण्यात यावी. सदर थकबाकीचा पहिला हप्ता सन २०१०–२०११ मध्ये देय होईल. तसेच पहिल्या हप्त्याची रक्कम भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करण्यात यावी.

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :– २९/८/२००९.

**सुनिल पारखी,**
**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) मा. नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

नगरसचिव

<u>पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता</u>

## पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र. ८
## सप्टेंबर २००९

पुणे महानगरपालिकेची **मासिक सर्वसाधारण सभा गुरुवार, दि.१७ सप्टेंबर २००९ रोजी दुपारी ४–०० (चार) वाजता श्री छत्रपती शिवाजीमहाराज सभागृहात** (मनपा सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

### प्रश्नोत्तरे

मुंबई प्रांतिक म न पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

### स्थायी समितीचे ठराव

<u>विषय क्र. १५२</u>

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/भूसंपादन/२४४ दि. ६/८/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. ५१०, दि. १४/८/२००९.

–––

मा.महा.आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे ...

पुणे महानगरपालिकेच्या मालकीचे पुणे पेठ शिवाजीनगर स.न.९७ गोखलेनगर येथील सावित्रीबाई फुले सभागृह भाडे तत्वावर चालविणेस देणेकामी निविदा मागवल्या असता आलेल्या ६ निविदांपैकी अ.क्रं. १चे निविदाधारक अस्लम करीम मिरजकर,६४,जनवाडी ,पुणे.१६ यांची निविदा मनपा अपेक्षित रकमेपेक्षा सर्वात जास्त म्हणजेच मासिक भाडे र.रुपये २२,१२२/– इतकी असल्याने त्यांना पुणे पेठ शिवाजीनगर स.न.९७ गोखलेनगर येथील सावित्रीबाई फुले सभागृह क्षेत्रफळ ३३४.२० चौ.मी. बांधकाम ताबा दिनांकापासून ५ वर्षे कालावधीसाठी मासिक भाडे र.रुपये २२,१२२/– स्विकारुन भाडे तत्वावर चालविणेस देणेस, मासिक भाडे प्रतिवर्षी २.५% भाडेवाढ करणेस, याकरिता त्यांचेशी निविदा अटी शर्ती नुसार आवश्यक तो करारनामा करणेस तसेच मनपाचे येणारे अन्य शासकीय सर्व कर सदरच्या ठेकेदाराने वेळच्या वेळी भरणेस व ताबा देणेपुर्वी ६ महिन्याचे मासिक भाडे रक्कम अनामत म्हणून व ३ महिन्याचे मासिक भाडे रक्कम आगाऊ स्विकारणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्यसभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्र. १५३</u>

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/उआ/जनरल/२५० दि. १०/८/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. ५२९, दि. १४/८/२००९.

–––

मा.महा.आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे–

अंदाजपत्रकातील मान्य तरतुदीमधून र.रुपये १० लाखाचे वर्गीकरण उद्यान कार्यालय, सन २००९–१० भांडवली कामे, १६–प्राणी संग्रहालये वगैरे, २–निरनिराळ्या उद्यानाची सुधारणा या खात्यातुन उप आयुक्त(जनरल) पुणे येथे दि. ३०/५/२००९ रोजी झालेल्या मराठी चित्रपट महोत्सवाच्या पारितोषिक वितरण समारंभासाठी सहप्रायोजकत्व स्विकारुन र.रुपये १० लाख या खात्याकडे वर्ग करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्र. १५४</u>**

संदर्भ :- १) मा.अशोक येनपुरे व मा.विरेंद्र किराड यांचे दि. १७/८/२००९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठ.क्र. ५६७, दि. १८/८/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

पुणे महानगरपालिकेच्या विद्यमान नगरसेवकांप्रमाणेच शिक्षण मंडळ व परिवहन महामंडळाकडील विद्यमान नगरसेवकांना वैद्यकिय सुविधेचा लाभ देण्यात येतो. या वैद्यकिय सुविधेचा लाभ माजी नगरसेवकांना उपलब्ध व्हावा म्हणून मा.स्थायी समिती ठराव क्र. १३४० दि. ११/११/२००८ व मा.मुख्य सभा ठराव क्र. ३७२ दि. २४/११/२००८ ने मान्यता दिलेली आहे.

त्याचप्रमाणे पी.एम.टी. व शिक्षण मंडळाकडील सर्व माजी सभासदांना वैद्यकिय सुविधेचा लाभ उपलब्ध करुन देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्र. १५५</u>**

संदर्भ :- १) मा.पोलिस आयुक्त यांचे अर्धशासकिय पत्र क्र.प्र.शा./४/व्हिडिओ/कॅमेरानिधी/०९, दि.२४/६.०९ चे पत्र.
२) मा.महापौर यांचे मा.महापालिका आयुक्त यांना जा.क्र.१४१०, दि.२.७.०९ चे पत्र.
३) मा.पोलिस आयुक्त,पुणे यांचे महा.आयुक्त यांना क्र.८४१६,दि.१५.७.०९ चे पत्र.
४) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचेकडील ठ.क्र.७/४१,दि.१४.८.२००९
५) मा.नगरसचिव यांचे क्र. २१९९ दि. १७/८/२००९ चे पत्र.
६) मा. स्थायी समिती ठ.क्र. ५७३, दि. १८/८/२००९.

---

मा.नगरसचिव यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन -

आगामी गणेशोत्सव,विधानसभा निवडणूक तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने शहरात विविध ठिकाणी व्हिडिओ कॅमेरे बसविणेकरिता पोलिस विभागास व्हिडिओ कॅमेरे खरेदीसाठी सन २००९-२०१० चे अंदाजपत्रकातील महापौर विकास निधीतून र.रू.पांच लाखाचा धनादेश देण्यात आला असून सदरच्या खर्चास पश्चात मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्र. १५६</u>**

संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/भूसंपादन/१९२ दि. ८/७/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठ.क्र. ६०५, दि. २४/८/२००९.

---

मा.महा.आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे-

पुणे पेठ एरंडवणा फा.प्लॉट नं. ७६अ प्रभाग क्र. २९ लॉ कॉलेज रस्ता शांतीशिला भागात बांधणेत आलेल्या विरंगुळा केंद्र क्षेत्रफळ २१७.८७ चौ.मी. भाडे तत्वावर चालविण्यास देणेबाबत निविदा मागवली असता आलेल्या ३ निविदांपैकी मनपाचे अपेक्षित मासिक भाडे र.रुपये ९,०१४/- पेक्षा सर्वात जास्त मासिक भाडे रक्कम देऊ करणारे ठेकेदार आमदार विनायक निम्हण मित्र मंडळ, ग्रीन पार्क हॉटेलजवळ, बाणेर रोड, पुणे ८ यांचे मासिक भाडे र.रुपये ९,१००/- स्विकारुन ताबा दिनांकापासून त्यांना ५ वर्षे मुदतीसाठी चालविणेस देणेस, मासिक भाडे रकमेत प्रतिवर्षी २.५% भाडेवाढ करणेस, त्याकरिता त्यांचेशी आवश्यक तो करारनामा करणेस तसेच मनपाचे येणारे सर्व कर सदरच्या ठेकेदाराने वेळच्या वेळी भरणेस व ताबा देणेपुर्वी ६ महिन्याचे मासिक भाडे रक्कम अनामत म्हणून व ३ महिन्याचे मासिक भाडे रक्कम आगाऊ स्विकारणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता देण्यात येत आहे.

(टिप :- अ.क्र. १ व ३ या ठेकेदारांनी देऊ केलेल्या रकमा समान होत्या परंतू क्र. ३ च्या ठेकेदाराने

निविदेसोबत जोडलेल्या कागदपत्रामध्ये विसंगती असल्याने त्यांची निविदा टेंडर सेल विभागामार्फत अपात्र ठरविण्यात आली आहे.)

<u>विषय क्र. १५७</u>

